# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **30/09/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. रिसोड हद्दीतील ग्राम लोणी खुर्द येथून ट्रॅक्टर चोरट्यास अटक.

## लोणी खुर्द येथून ट्रॅक्टर चोरास अटक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लोणी** ▪ रिसोड तालुक्यातील लोणी बुद्रुक पासून जवळच असलेल्या लोणी खुर्द गावामध्ये लोणार तालुक्यातील चिंचोली सांगळे येथील चोरी गेलेला ट्रॅक्टर लोणार पोलिसांनी शेतकरी असल्याचे भासवत तशा पद्धतीचा वेशातर करून ट्रॅक्टर सह चोर अलगद पकडला ही घटना २७ सप्टेंबर रोजी घडली.

चिंचोली सांगली तालुका लोणार येथील शेतकरी फिर्यादी पांडुरंग सांगळे यांचा महिंद्रा ५७५ डीआय कंपनीचा ट्रॅक्टर व सोनालिका कंपनीचा रोटावेटर दिनांक ९ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२० दरम्यान राहत्या घरासमोरून चोरी गेला होता. त्याबाबत लोणार पोलीस स्टेशनला ट्रॅक्टर चोरीची तक्रार दिली होती. त्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरूद्ध लोणार

### पोलीसांनी वेशांतर करुन चोरट्यास पकडले

पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. दरम्यान फिर्यादी सांगळे हे लोणी खुर्द तालुका रिसोड येथे नातेवाईकासाठी जुना ट्रॅक्टर खरेदीसाठी गेले असता त्यांना लोणी खुर्द येथील समाधान नाथराव सोनवणे वय २६ वर्ष याने फिर्यादी व त्याचे नातेवाईकाला सदर ट्रॅक्टर विक्रीसाठी दाखविला मात्र फिर्यादीने हा ट्रॅक्टर आपलाच असल्याचे ओळखले व त्यांना उद्या पैसे देऊन ट्रॅक्टर घेऊन जातो असे सांगितले व घडलेल्या प्रकाराची माहिती लोणार पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ठाकूर यांना सांगितली त्या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप ठाकूर यांनी आपले सहकारी पोलीस उपनिरीक्षक काळे यांच्यासह लोणी खुर्द येथे जाऊन ट्रॅक्टर ताब्यात घेण्याबाबत आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना दिल्या. यावेळी लोणार पोलिसांनी शेतकरी असल्याचे भासवत वेशांतर करून लोणी खु तालुका रिसोड जिल्हा वाशिम येथे आरोपीकडे असलेला ट्रॅक्टर विक्री बाबत चर्चा केली. यावेळी आरोपीने मढी शिवारामध्ये असलेल्या एका शेतामध्ये सदर ट्रॅक्टर दाखविला. सदर ट्रॅक्टर दाखविताच लोणार पोलिसांनी आरोपीला व ट्रॅक्टर सह ताब्यात घेतले. त्याच्याजवळ असलेले चोरीचे ट्रॅक्टर व रोटर पोलीस स्टेशनला जमा करण्यात आले. आरोपीला २८ सप्टेंबर रोजी न्यायालयासमोर हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे. या ट्रॅक्टर चोरी प्रकरणात अजून किती साथीदार आहेत याचा तपास लोणार पोलीस करत आहे ( वार्ता )